Estd: 1962
"A++"
Accredited by NAAC
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय : Research Strengthening Scheme सन २०१८-२०१९ योजनेच्या मुदतवाढीबाबत.**

शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांना संशोधन कार्यामध्ये वाढ होऊन तसेच त्यांच्या संशोधन कार्यकक्षेमध्ये जास्तीत जास्त संशोधन प्रकल्प हाती घ्यावेत यासाठी ज्या शिक्षकांकडे संशोधन प्रकल्प नाहीत किंवा संशोधन प्रकल्पाची मुदत संपलेली आहे अशा शिक्षकांसाठी सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून Research Strengthening Scheme ही योजना विद्यापीठ निधीतून सुरु करण्यात आली आहे.

सदर योजनेचा कालावधी २ वर्षासाठी असून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी पूर्ण झाला आहे. तथापि, दरम्यानच्या काळात उद्भवलेल्या कोव्हीड-१९ च्या महामारीमुळे व योजनेच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार प्रकल्प प्रमुखांच्या मागणीनुसार सहा महिन्यांची (सप्टेंबर २०२१ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु, सदर कालावधीमध्ये प्रकल्प पुर्ण करण्यात अडथळे निर्माण होत असलेने प्रकल्पासाठी आणखी मुदतवाढ मिळावी अशी विनंती पत्रे प्रकल्प प्रमुखांकडून प्राप्त झाली आहेत.

**याअनुषंगाने दि. १५/०९/२०२१ रोजी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये Research Strengthening Scheme सन २०१८-२०१९ योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या प्रकल्पांना कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर मार्च, २०२२ पर्यंत मंजूर निधीच्या अधीन राहुन मुदतवाढ देण्यात आली आहे तसेच, यानंतर सदर योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पांना कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही. सदरची मुदतवाढ ही अंतिम समजण्यात यावी.**

सबब, ज्या संबंधित शिक्षकांनी आपले प्रकल्प अहवाल अद्याप सादर केलेले नाहीत त्यांनी मार्च, २०२२ पूर्वी अहवाल सादर करावेत.

**उपकुलसचिव,**
**महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग**
**शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर**

**जा.क्र.एस.यु./म.वि.वि.विभाग/** 227
**दि.** 29 SEP 2021

प्रति,

- मा. विभागप्रमुख, सर्व अधिविभाग / केंद्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- मा. सर्व शिक्षकवृंद, सर्व अधिविभाग / केंद्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- इंटरनेट युनिट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**टीप : सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे.**